# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## रास पंचाध्याय (10.32)



नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्॥

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्॥

श्रीमद्भागवतमहापुराणम्

दशमः स्कंधः

अथ द्वात्रिंशोऽध्यायः

श्रीशुक उवाच

इति गोप्यः(फ्) प्रगायन्त्यः(फ्), प्रलपन्त्यश्च चित्रधा ।
रुरुदुः(स्) सुस्वरं(म्) राजन्, कृष्णदर्शनलालसाः ॥ 1॥

प्रगा+ यन्त्यः(फ्), प्रलपन्+ त्यश्च

श्री शुकाचार्य म्हणतात-परीक्षिता! अशा प्रकारे निरनिराळ्या रीतीने गाणाऱ्या आणि विलाप करणाऱ्या गोपी श्रीकृष्णांच्या दर्शनाच्या लालसेने मोठ्यामोठ्याने रडू लागल्या.॥ 1 ॥

तासामाविरभूच्छौरिः(स्), स्मयमानमुखाम्बुजः ।
पीताम्बरधरः(स्) स्रग्वी, साक्षान्मन्मथमन्मथः ॥ 2॥

तासामा+ विरभूच् + छौरिः(स्), स्मयमा+ नमुखाम्बुजः, साक्षान्+ मन्मथ+ मन्मथः

त्याचवेळी त्यांच्या मध्यभागी भगवान श्रीकृष्ण प्रगट झाले .त्यांचे मुखकमल स्मित हास्याने खुलले होते. गळ्यात वनमाला होती, पितांबर धारण केला होता. त्यांचे हे रूप कामदेवाला ही मोहविणारे होते.॥ 2 ॥

तं(वँ) विलोक्यागतं(म्) प्रेष्ठं(म्), प्रीत्युत्फुल्लदृशोऽबलाः ।

उत्तस्थुर्युगपत् सर्वास्- तन्वः(फ्) प्राणमिवागतम् ॥ 3॥

प्रीत्युत् + फुल्लदृशोऽ+ बलाः, उत्तस् + थुर्युगपत्

तू प्रियतम आल्याचे पाहून गोपींचे डोळे प्रेमाने आणि आनंदाने प्रफुल्लित झाले. जशी अचेतन शरीरांमध्ये प्राणांचा संचार होताच ती उठावी, त्याप्रमाणे त्या सर्वजणी एकदम उठून उभ्या राहिल्या. ॥ 3 ॥

काचित् कराम्बुजं(म्) शौरेर्- जगृहेऽञ्जलिना मुदा ।

काचिद् दधार तद्बाहु- मं(म्)से चन्दनरूषितम् ॥ 4॥

चन्द+ नरूषितम्

कोणी आनंदाने श्रीकृष्णांचा हात आपल्या दोन्ही हातांमध्ये धरला, दुसरीने त्यांचा चंदनचर्चित बाहू आपल्या खांद्यावर घेतला.॥ 4 ॥

काचिदञ्जलिनागृह्णात्- तन्वी ताम्बूलचर्वितम् ।

एका तदङ्घ्रिकमलं(म्), सन्तप्ता स्तनयोरधात् ॥ 5॥

काचिदञ्+ जलिना+ गृह्णात्, ताम्बू+ लचर्वितम्

कोणी भगवंतांनी खाल्लेला विडा आपल्या हातात घेतला. तर एका वीरहतप्त गोपीने त्यांचे चरण कमल आपल्या वक्षः स्थळावर ठेवून घेतले. ॥ 5 ॥

एका भ्रुकुटिमाबध्य, प्रेमसं(म्)रम्भविह्वला ।

घ्नतीवैक्षत् कटाक्षेपैः(स्), सं(न्)दष्टदशनच्छदा ॥ 6॥

प्रेमसं(म्)रम् + भविह्वला, घ्नन्ती+ वैक्षत्, सं(न्)दष्ट+ दशनच् + छदा

एक गोपी प्रणय कोपाने कृद्ध होऊन, भुवया उंचावून, दात ओठ चावीत, आपल्या कटाक्ष बाणांनी त्यांना घायाळ करीत, त्यांच्याकडे पाहू लागली. ॥ 6 ॥

अपरानिमिषद्दृग्भ्यां(ञ्), जुषाणा तन्मुखाम्बुजम् ।

आपीतमपि नातृप्यत्, सन्तस्तच्चरणं(यँ) यथा ॥ 7॥

अपरा+ निमिषद्+ दृग्भ्यां(ञ्), तन्मुखाम् + बुजम्, सन्तस्+ तच्+ चरणं(यँ)

आणखी एक गोपी डोळ्यांच्या पापण्या न मिटता त्यांच्या मुखकमलातील मकरंद पिऊ लागली; परंतु ज्याप्रमाणे संत पुरुष भगवंतांच्या चरणांच्या दर्शनाने कधीही तृप्त होत नाहीत, त्याचप्रमाणे ती तृप्त होत नव्हती. ॥ 7 ॥

तं(ङ्) काचिन्नेत्ररन्ध्रेण, हृदिकृत्य निमील्य च ।

पुलकाङ्ग्युपगुह्यास्ते, योगीवानन्दसम्प्लुता ॥ 8॥

काचिन्+ नेत्ररन्+ ध्रेण, पुलकाङ् + ग्युप+ गुह्यास्ते, योगीवा+ नन्दसम्प्लुता

कोणी एक गोपी डोळ्यातून भगवंतांना हृदयात घेऊन गेली आणि तिने डोळे बंद केले. आता मनोमन भगवंतांना अलिंगन दिल्याने तिचे शरीर पुलकित झाले, रोम- अन्- रोम उभे राहिले आणि योग्याप्रमाणे ती परमानंदामध्ये मग्न झाली. ॥ 8 ॥

सर्वास्ताः(ख्) केशवालोक- परमोत्सवनिर्वृताः ।

जहुर्विरहजं(न्) तापं(म्), प्राज्ञं(म्) प्राप्य यथा जनाः ॥ 9॥

परमोत्+ सवनिर्वृताः

परमात्म्याची भेट झाल्यावर ज्याप्रमाणे मुमुक्षु संसारतापातून मुक्त होतात, त्याप्रमाणे श्रीकृष्णांच्या दर्शनाने सर्व गोपींना परमानंद झाला आणि विरहामुळे झालेले दुःख त्या विसरल्या. ॥ 9 ॥

ताभिर्विधूतशोकाभिर्- भगवानच्युतो वृतः ।

व्यरोचताधिकं(न्) तात, पुरुषः(श्) शक्तिभिर्यथा ॥ 10॥

ताभिर्विधू+ तशोकाभिर्, भगवा+ नच्युतो

परीक्षेता! ज्याप्रमाणे शक्तींनी युक्त नारायण अधिक शोभावे, त्याप्रमाणे विरहव्यथेतून मुक्त झालेल्या गोपींमध्ये श्रीकृष्ण विशेषच शोभू लागले.॥ 10 ॥

ताः(स्) समादाय कालिन्द्या, निर्विश्य पुलिनं(वँ) विभुः ।

विकसत्कुन्दमन्दार- सुरभ्यनिलषट्पदम् ॥ 11॥

विकसत् + कुन्दमन्दार, सुरभ्य+ निलषट्पदम्

यानंतर भगवान श्रीकृष्णांनी त्या व्रज सुंदरीना आपल्याबरोबर घेऊन यमुनेच्या वाळवंटात प्रवेश केला. त्यावेळी उमललेल्या कुंद आणि मंदराच्या फुलांचा सुगंध घेऊन सुगंधित वायू वाहत होता आणि त्याच्या वासाने धुंद झालेले भ्रमर इकडे तिकडे गुंजारव करीत होते.॥ 11 ॥

शरच्चन्द्रां(म्)शुसन्दोह- ध्वस्तदोषातमः(श्) शिवम् ।

कृष्णाया हस्ततरला- चितकोमलवालुकम् ॥ 12॥

शरच् + चन्द्रां(म्)शु+ सन्दोह, ध्वस्त+ दोषातमः(श्)

शरद पौर्णिमेच्या चांदण्यामुळे रात्रीच्या अंधाराचा काही पत्ताच नव्हता. सगळीकडे मांगल्य पसरले होते. तेथे यमुना नदीने स्वतः आपल्या लाटांच्या हातांनी कोमल वाळू पसरली होती. ॥ 12 ॥

तद्दर्शनाह्लादविधूतहृद्रुजो,

मनोरथान्तं(म्) श्रुतयो यथा ययुः ।

स्वैरुत्तरीयैः(ख्) कुचकुं(ङ्)कुमां(ङ्)कितै-

रचीक्लृपन्नासनमात्मबन्धवे ॥ 13॥

**तद्दर्शनाह् + लादविधू+ तहृद्रुजो, रचीक्लृपन्ना+ सनमात् + मबन्धवे**

**श्रीकृष्णांच्या दर्शनाच्या आनंदाने गोपींच्या हृदयातील सगळी व्यथा नाहीशी होऊन त्यांचे मनोरथ पूर्ण झाले. जसे वेद कर्मकांडांचे वर्णन करूनही ईश्वर दर्शना अभावी अतृप्त असतात, पण ज्ञानकांडाचे प्रतिपादन करून ईश्वर दर्शनाने कृतकृत्य होतात. आता त्यांनी आपल्या वक्षः स्थळावर लागलेल्या कुंकुम-केशराच्या रंगाने रंगलेली उपस्ने आपल्या परमप्रियाला बसण्यासाठी अंथरली.॥ 13॥**

तत्रोपविष्टो भगवान् स ईश्वरो

योगेश्वरान्तर्हृदि कल्पितासनः ।

चकास गोपीपरिषद्गतोऽर्चितस् -

त्रैलोक्यलक्ष्म्येकपदं(वँ) वपुर्दधत् ॥ 14॥

**योगेश्वरान्+ तर्हृदि, गोपीपरिषद्+ गतोऽर्चितस्, त्रैलोक्य+ लक्ष्म्ये+ कपदं(वँ)**

**योगेश्वरांनी आपल्या हृदयामध्ये ज्यांच्यासाठी आसन केलेले असते, तेच सर्व शक्तिमान भगवान तेथे गोपींच्या ओढण्यांवर बसले. गोपींच्या मध्यभागी त्यांच्याकडून पूजित होऊन भगवान अतिशय शोभून दिसत होते. त्रैलोख्यातील सौंदर्य ज्यांच्या ठिकाणी एकवटले होते. असा श्रीविग्रह त्यांनी यावेळी धारण केला होता. ॥ 14 ॥**

सभाजयित्वा तमनङ्गदीपनं(म्)

सहासलीलेक्षणविभ्रमभ्रुवा ।

सं(म्)स्पर्शनेनाङ्ककृताङ्घ्रिहस्तयोः(स्)

सं(म्)स्तुत्य ईषत्कुपिता बभाषिरे ॥ 15॥

**सहासली+ लेक्षण+ विभ्रम+ भ्रुवा, सं(म्)स्पर्शनेनाङ्+ ककृताङ्+ घ्रिहस्तयोः(स्)**

**भगवान श्रीकृष्ण आपल्या या अलौकिक सौंदर्याच्या द्वारा त्यांचे प्रेम आणि आकांक्षा आणखी उंचावून ठेवीत होते. गोपींनी आपले सलज्ज पहाणे, स्मितहास्य आणि विलासपूर्ण कटाक्ष यांनी त्यांचा सन्मान केला. कोणी त्यांचे चरण कमल मांडीवर घेऊन चुरले, तर कोणी त्यांचे हात कुरवाळले. जणू हीच त्यांनी केलेली स्तुती! नंतर मात्र काहीशा रागावून त्या म्हणाल्या. ॥ 15 ॥**

## गोप्य ऊचुः

**भजतोऽनुभजन्त्येक, एक एतद्विपर्ययम् ।**

**नोभयां(म्)श्च भजन्त्येक, एतन्नो ब्रूहि साधु भोः ॥ 16॥**

भजतो+ ऽनुभजन् + त्येक, एतद्+ विपर्ययम्

**गोपी म्हणाल्या- हे श्री कृष्णा! काही लोक प्रेम करणाऱ्यांवरच प्रेम करतात आणि काही लोक प्रेम न करणाऱ्यांवर सुद्धा प्रेम करतात. परंतु काही जण तर या दोघांवरही प्रेम करीत नाहीत. तर याविषयी आम्हाला समजावून सांगा. ॥ 16 ॥**

## श्रीभगवानुवाच

**मिथो भजन्ति ये सख्यः(स्), स्वार्थैकान्तोद्यमा हि ते ।**

**न तत्र सौहृदं(न्) धर्मः(स्), स्वार्थार्थं(न्) तद्धि नान्यथा ॥ 17॥**

स्वार्थैकान्+ तोद्यमा

**श्रीभगवान म्हणाले- सख्यांनो!जे प्रेम करणाऱ्यांवर प्रेम करतात, त्यांचा सर्व उद्योग हा केवळ स्वार्थासाठीच असतो. त्यामध्ये सौहार्द नाही की धर्म नाही. त्यांचे प्रेम फक्त स्वार्थापोटीच आहे; या खेरीज त्यांचा दुसरा कोणताही हेतू नाही.॥ 17 ॥**

**भजन्त्यभजतो ये वै, करुणाः(फ्) पितरौ यथा ।**

**धर्मो निरपवादोऽत्र, सौहृदं(ञ्) च सुमध्यमाः ॥ 18॥**

भजन्त्य+ भजतो, निर+ पवादोऽत्र

**हे सुंदरीनो! जे लोक प्रेम न करणाऱ्यांवरही प्रेम करतात-जसे, स्वभावतः च करुणाशील असलेले सज्जन आणि माता- पिता. त्यांच्या मनात दुसऱ्यांचे हित व्हावे, एवढीच इच्छा असते आणि त्यांच्या व्यवहारामध्येच खरा धर्म असतो. ॥ 18 ॥**

**भजतोऽपि न वै केचिद् - भजन्त्यभजतः(ख्) कुतः ।**

**आत्मारामा ह्याप्तकामा, अकृतज्ञा गुरुद्रुहः ॥ 19॥**

**काही लोक प्रेम करणाऱ्यांवरही प्रेम करीत नाहीत ,मग प्रेम न करणाऱ्यांच्यावर कोठून करतील? असे लोक चार प्रकारचे असतात. एक, जे आपल्या स्वरूपातच रमणारे असतात. दुसरे,जे कृतकृत्य असतात. तिसरे, स्वतःवर कोण प्रेम करतात हे ज्यांना माहीतच नसते आणि चौथे, जाणून- बुजून परोपकारी गुरुतुल्य लोकांचा सुद्धा द्रोह करणारे.॥ 19 ॥**

**नाहं(न्) तु सख्यो भजतोऽपि जन्तून्**

**भजाम्यमीषामनुवृत्तिवृत्तये ।**

**यथाधनो लब्धधने विनष्टे**

**तच्चिन्तयान्यन्निभृतो न वेद ॥ 20॥**

**भजाम् + यमीषा+ मनुवृत्ति+ वृत्तये, तच्चिन् + तयान्यन्+ निभृतो**

सख्यांनो! मी तर प्रेम करणाऱ्यांवर सुद्धा प्रेम करीत नाही. कारण त्यांची चित्तवृत्ती माझ्याकडेच नेहमी लागून राहावी म्हणून. जसे एखाद्या निर्धन पुरुषाला कधी पुष्कळसे धन मिळावे आणि नंतर ते नाहीसे व्हावे तेव्हा त्याचे हृदय जसे हरवलेल्या धनाच्या चिंतेने भरून जाते, तसाच मी सुद्धा प्राप्त होऊन होऊन पुन्हा लपून राहतो. कारण नाहीशा झालेल्या माझेच भक्तांनी चिंतन करावे म्हणून. ॥ 20 ॥

एवं(म्) मदर्थोज्झितलोकवेदं-

स्वानां(म्) हि वो मय्यनुवृत्तयेऽबलाः ।

मया परोक्षं(म्) भजता तिरोहितं(म्)

मासूयितुं(म्) मार्हथ तत् प्रियं(म्) प्रियाः ॥ 21॥

मदर्थोज्+ झितलो+ कवेद, मय्यनु+ वृत्तयेऽ+ बलाः

गोपींनो! तुम्ही माझ्यासाठी लोकमर्यादा, वेदोपदेश आणि आपल्या नातलगांनाही सोडले आहे, याविषयी शंका नाही. अशा स्थितीत तुमची मनोवृत्ती माझ्या ठिकाणीच लागुन राहावी, यासाठी अप्रत्यक्षपणे तुमच्यावर प्रेम करीत मी लपलो होतो. म्हणून हे प्रियांनो! तुम्ही, तुम्हाला प्रिय असणाऱ्या माझ्या, तुमच्यावरील प्रेमात उणीव पाहू नका.॥ 21 ॥

न पारयेऽहं(न्) निरवद्यसं(यँ)युजां(म्)

स्वसाधुकृत्यं(वँ) विबुधायुषापि वः ।

या माभजन् दुर्जरगेहशृं(ङ्)खलाः(स्)

सं(वृँ)वृश्च्य तद् वः(फ्) प्रतियातु साधुना ॥ 22॥

दुर्जरगे+ हशृं(ङ्)खलाः(स्)

घर संसाराच्या तोडण्यास कठीण बेड्या तुम्ही माझ्यासाठी तोडून मला भजू लागलात. माझ्याशी तुमचा हा आत्मिक संयोग सर्वथैव निर्दोष आहे. देवांचे आयुष्य जरी मला मिळाले, तरी तुमच्या या प्रेम, सेवा आणि त्यागाचे ऋण मी फेडू शकणार नाही म्हणून तुम्हीच मला आपल्या सौजन्याने तुमच्या ऋणातून मुक्त करावे.॥ 22 ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्)

दशमस्कन्धे पूर्वार्धे रासक्रीडायां(ङ्) गोपीसान्त्वनं(न्) नाम द्वात्रिं(म्)शोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः।।